नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०४/०६/२०२५ (बुधवार)**

---

## पोलीस स्टेशन केळवद अंतर्गत कवठा मार्गाबाबत...

मा.जिल्हाधिकारी, नागपूर जिल्हा यांचे आदेशान्वये श्री. मेसर्स ग्रेव्हेलीया इंटरप्राईजेस तर्फे श्री. संजय कामेश्वर झॉ. रा. सौंसर जि. छिदंवाडा मध्यप्रदेश यांना मध्यप्रदेश राज्यातुन महाराष्ट्र राज्यात वाळु/रेती आणण्यासाठी झिरो रॉयल्टी वाहतुक परवान्यास मंजूरी दिलेली आहे. मध्यप्रदेश राज्यातुन महाराष्ट्र राज्यात होणाऱ्या वाहतुकी संदर्भात सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उप विभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग तसेच प्रभारी अधिकारी ,पोलीस स्टेशन केळवद यांनी वेळोवळी त्यांची रॉयल्टी / झिरो रॉयल्टी तसेच ओव्हरलोड बाबत चेक केले असता, त्यांची रॉयल्टी अधिकृत आढळुन आलेली आहे. तसेच सदरच्या रॉयल्टी/झिरो रॉयल्टी ची पडताळणी तहसीलदार सावनेर यांचे कडुन करण्यात आली. सदर वाळु वाहतुक धारक हे मध्यप्रदेश राज्यातुन खापा वन विभागाच्या राखीव जंगल भागातुन कच्चा रस्त्यावरुन वाहतुक करीत आहेत. त्या संदर्भात संबधीत हत्तीसर्रा ग्रामपंचायत यांना सदरचे रस्त्याबाबत प्रभावी उपाययोजना करण्याबाबत पत्र दिलेले आहे. महसुल विभागाला सुध्दा याबाबत पत्र दिलेले आहे. सदरचा रस्ता हा वन विभागाचे राखीव जंगलातुन जात असल्याने, वन विभाग खापा व त्यांचे वरिष्ठ कार्यालयास तसेच प्रादेशीक परिवहन अधिकारी नागपूर ग्रामिण यांना सुध्दा पत्र देुवन मध्य प्रदेशातुन महाराष्ट्र राज्यात राखीव जंगल मार्गावर त्यांचे विभागाचे चेक पोस्ट उभारण्याबाबत पत्र दिलेले आहे.

सर्व प्रकारच्या अवैध वाहतुकीवर आळा घालण्याकरीता एन.एच क्रं. ५४७ सौसंर – सावनेर मार्गाला मौजा केळवद जवळ जोडणाऱ्या कवठा गावाचे फाटयाजवळ पोलीस विभागाकडुन चेक पोस्ट उभारण्यात आले असुन, तेथे नियमीत वाहनांची रॉयल्टी/झिरो रॉयल्टी चेक करण्यात येत आहे.




## नागपुर ग्रामीण जिल्हया अंतर्गत घेण्यात आला रूटमार्च, दंगा काबु योजना ,शांतता समितीची बैठक तसेच गोरक्षकाच्या बैठक

आगामी बकरी ईद सणोत्सव असल्याने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणेकामी नागपुर ग्रामीण जिल्हयात खालील पोलीस स्टेशनला रूट मार्च , आणि शांतता सिमती बैठक ,गोरक्षांची बैठक घेण्यात आली आहे.

**पोलीस स्टेशन सावनेर** :— दिनांक ३१/०५/२०२५ रोजी पोलीस स्टेशन सावनेर येथे श्री अनिल म्हस्के सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी ,सावनेर विभाग यांच्या उपस्थितीत मशिद ट्रस्ट समितीचे प्रमुख पदाधिकारी यांची बैठक घेण्यात आली. आणि दिनांक ०३/०६/२०२५ रोजी पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत सावनेर पोलीस स्टेशनचे अधिकारी अंमलदार यांच्यासह आर.सी.पी.पथक यांनी रूट मार्च काढला. सदर रूटमार्च सावनेर शहरात घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन केळवद** :— पोलीस स्टेशन केळवद येथे प्रभारी अधिकारी, केळवद पोलीस स्टेशन यांनी दिनांक ०२/०६/२०२५ रोजी मशिद ट्रस्ट समितीचे प्रमुख पदाधिकारी व मौलाना अशी मुस्लीम बांधवांची बैठक घेतली आणि दिनांक ०३/०६/२०२५ रोजी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील गोरक्षकांची बैठक घेतली.

**पोलीस स्टेशन खापा** :—दिनांक ०३/०६/२०२५ रोजी पोलीस स्टेशन खापा येथे प्रभारी अधिकारी, खापा पोलीस स्टेशन यांनी शांतता समितीच्या सदस्यांची बैठक घेतली आणि दिनांक ०४/०६/२०२५ रोजी पोलीस स्टेशन खापा अंतर्गत खापा पोलीस स्टेशनचे अधिकारी अंमलदार यांच्यासह प्रमुख चौक ,गर्दीचे ठिकाण आणि प्रमुख मार्गांवर रूटमार्च घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :—दिनांक ३१/०५/२०२५ रोजी पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे श्री अनिल म्हस्के सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी ,सावनेर विभाग यांच्या उपस्थितीत मशिद समितीचे अध्यक्ष आणि सदस्य यांची बैठक घेण्यात आली. तसेच दिनांक ०४/०६/२०२५ रोजी श्री अनिल म्हस्के सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी ,सावनेर विभाग यांच्या उपस्थितीत पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत कळमेश्वर शहरात रूट मार्च घेण्यात आला तसेच दंगा काबु योजना सराव सुध्दा घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक ०४/०६/२०२५ रोजी पोलीस स्टेशन उमरेड येथे प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन उमरेड यांनी पोलीस पाटलांची बैठक घेतली आणि पोलीस स्टेशनच्या हद्दीतील गोरक्षकांची स्वतंत्र बैठक घेतली.

**पोलीस स्टेशन वेलतुर** :— दिनांक ०३/०६/२०२५ रोजी प्रभारी अधिकारी वेलतुर पोलीस स्टेशन यांनी मशिद ट्रस्ट समितीचे प्रमुख पदाधिकारी व मौलाना अशी मुस्लीम बांधवांची बैठक घेतली आणि पोलीस स्टेशनच्या हद्दीतील गोरक्षकांची स्वतंत्र बैठक घेतली.

**पोलीस स्टेशन कुही** :— दिनांक ३१/०५/२०२५ रोजी पोलीस स्टेशन कुही येथे प्रभारी अधिकारी कुही पोलीस स्टेशन यांनी मशिद ट्रस्ट समितीचे प्रमुख पदाधिकारी व मौलाना अशी मुस्लीम बांधवांची बैठक घेतली आणि दिनांक ०४/०६/२०२५ रोजी कुही पोलीस स्टेशन हद्दीतील गोरक्षकांची बैठक घेतली.

**पोलीस स्टेशन कोटाल** :— दिनांक ०४/०६/२०२५ रोजी पोलीस स्टेशन काटोल येथे श्री बापु रोहोम, उपविभागिय पोलीस अधिकारी ,काटोल विभाग यांच्या उपस्थितीत मशिद ट्रस्ट समितीचे प्रमुख पदाधिकारी व मौलाना अशी मुस्लीम बांधवांची बैठक घेतली. व त्यांना शांततेत सणोत्सव

साजरा करून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याबाबत मार्गदर्शन केले. दिनांक ०४/०६/२०२५ रोजी पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत काटोल पोलीस स्टेशनचे अधिकारी अंमलदार यांच्यासह आर.सी.पी. पथक यांनी रूट मार्च काढला. सदर कटोल शहरात घेण्यात आला.रूट मार्च नंतर दंगा काबु योजना सराव सुध्दा घेण्यात आली.

**पोलीस स्टेशन कोंढाळी** :— दिनांक ०३/०६/२०२५ रोजी प्रभारी अधिकारी कोंढाळी पोलीस स्टेशन यांनी शांतता समिती सदस्यांची बैठक घेतली आणि ०४/०६/२०२५ रोजी पोलीस स्टेशन हद्‌दीतील गोरक्षकांची बैठक घेतली.

**पोलीस स्टेशन नरखेड** :— दिनांक ३१/०५/२०२५ रोजी पोलीस स्टेशन नरखेड येथे श्री बापु रोहोम, उपविभागिय पोलीस अधिकारी ,काटोल विभाग यांच्या उपस्थितीत शांतता समिती सदस्यांची बैठक घेतली आणि दिनांक ०४/०६/२०२५ रोजी श्री बापु रोहोम, उपविभागिय पोलीस अधिकारी ,काटोल विभाग यांच्या उपस्थितीत पोलीस स्टेशन नरखेड अंतर्गत नरखेड पोलीस स्टेशनचे अधिकारी अंमलदार यांच्यासह आर.सी.पी. पथक यांनी रूट मार्च काढला. सदर नरखेड येथे गर्दीच्या ठिकाणी प्रमुख रस्त्यांवर, चौकातुन घेण्यात आला. रूट मार्च नंतर दंगा काबु योजना सराव सुध्दा घेण्यात आली.

**पोलीस स्टेशन अरोली** :— दिनांक ०४/०६/२०२५ रोजी प्रभारी अधिकारी पो.स्टे अरोली यांनी पोलीस स्टेशन येथे मशिद ट्रस्ट समितीचे प्रमुख पदाधिकारी व मौलाना अशी मुस्लीम बांधवांची बैठक घेतली आणि पोलीस स्टेशन हद्‌दीतील गोरक्षकांची स्वतंत्र बैठक घेतली.

**पोलीस स्टेशन देवलापार** :— दिनांक ०२/०६/२०२५ रोजी प्रभारी अधिकारी देवलापार यांनी पोलीस स्टेशन येथे मशिद ट्रस्ट समितीचे प्रमुख पदाधिकारी व मौलाना अशी मुस्लीम बांधवांची बैठक घेतली आणि दिनांक ०४/०६/२०२५ रोजी पोलीस स्टेशन हद्‌दीतील गोरक्षकांची स्वतंत्र बैठक घेतली.

**पोलीस स्टेशन रामटेक** :— दिनांक ३१/०५/२०२५ रोजी श्री रमेश बरकते , उपविभागिय पोलीस अधिकारी ,रामटेक विभाग यांच्या उपस्थितीत पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत पोलीस स्टेशनचे अधिकारी अंमलदार यांच्यासह आर.सी.पी. पथक यांनी रूट मार्च काढला. सदर रूटमार्च रामटेक शहरात गर्दीच्या ठिकाणी प्रमुख रस्त्यांवर, चौकातुन घेण्यात आला. रूट मार्च नंतर दंगा काबु योजना सराव सुध्दा घेण्यात आली.

**पोलीस स्टेशन पारशिवणी** :— दिनांक ३०/०५/२०२५ रोजी पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांनी पोलीस स्टेशन येथे मशिद ट्रस्ट समितीचे प्रमुख पदाधिकारी व मौलाना अशी मुस्लीम बांधवांची बैठक घेतली आणि शांतता समिती सदस्यांची बैठक घेतली.

**पोलीस स्टेशन खापरखेडा** :— दिनांक ०४/०६/२०२५ रोजी पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांनी मशिद ट्रस्ट समितीचे प्रमुख पदाधिकारी व मौलाना अशी मुस्लीम बांधवांची तसेच शांतता समिती सदस्या बैठक घेतली.

वरप्रमाणे पोलीस स्टेशनला बैठक घेवुन उपस्थित सदस्यांना शांततेत सणोत्सव साजरा करून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याबाबत मार्गदर्शन केले. तसेच गोरक्षकांना मार्गदर्शन करण्यात आले तसेच योग्य सुचना देण्यात आल्या.




POLICE
POLICE


MH49AE1797


SWAMIJI NX


कृषी सेवा केंद्र





## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद
## १२ जनावरांची सुटका, स्थानिक गुन्हे शाखा,नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

दिनांक ०४/०६/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध धंदयांवर कारवाई कामी पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदार मार्फतीने माहीती मिळाली की, भंडारा कडुन नागपुर कडे बोलेरो पिकअप मध्ये अवैधरित्या गोवंश जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी भंडारा ते नागपुर रोड वर बोरगाव शिवार येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान एक विना क्रमांकाचे बोलेरो पिकअप वाहन येताना दिसले. पोलीसांनी वाहन चालकास वाहन थांबविण्याबाबत ईशारा केला असता वाहन चालकाने कार न थांबविता वडोदा मार्गे कुही च्या दिशेने पळुन गेला. पोलीसांनी त्याचा पाठलाग कला असता वाहन चालक आरोपी ब्राम्हीणी गावाजवळ रोडचे कडेला वाहन उभे करून पळुन गेला. पोलीसांनी वाहनाची पंचासमक्ष तपासणी केली असता त्यामध्ये १२ गोवंश जनावरे असे मिळुन आले. सदर गोवंश जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून एक विना क्रमांकाचे बोलेरो पिकअप वाहन किंमती ५,००,०००/— रूपये. व १२ गोवंश जनावरे किंमती २,४०,००० /— रूपये असा एकुण किंमती ७,४०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे. सुटका केलेल्या गोवंश जनावरांना पालन पोषणाच्या ज्ञान फाउंडेशन ,खरबी जि भंडारा येथे दाखल करण्यात आले आहे.

बोलेरो पिकअप वाहन चालक आणि मालक यांच्या विरूध्द प्राणी छळ प्रतिबंधक अधि. सहकलम महा. पशु संरक्षण अधिनियम, सहकलम ४९ ,३(५) भान्यासं,सहकलम २३९ मो.वा.का .अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद ०६ जनावरांची सुटका,देवलापार पोलसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन देवलापार** :— दिनांक ०४/०६/२०२५ रोजी देवलापार पोलीसांना गुप्त बातमीदार मार्फतीने माहीती मिळाली की, जबलपुर कडुन नागपुर मार्गे हुन्डाई वरना कार मध्ये अवैधरित्या गोवंश जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मानेगाव टेक येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान एक वरना कार क्रं एम.एच.०४ डि. एन ६९०७ कार भरधाव वेगाने येताना दिसली. पोलीसांनी वाहन चालकास वाहन थांबविण्याबाबत ईशारा केला असता वाहन चालकाने कार न थांबविता कारवाई गावाच्या दिशेने पळुन गेला. रात्रगस्त अधिकारी यांनी कारवाई गावाजवळ नाकाबंदी केली असता सदर वाहन चालक पोलीसांना पाहुन रोडच्या कडेला वाहन लावुन अंधाराचा फायदा घेत पळुन गेला. पोलीसांनी वाहनाची पंचासमक्ष तपासणी केली असता त्यामध्ये ०६ गोवंश जनावरे असे मिळुन आले. आरोपीने सदर कार चे मागचे सिट काढुन त्यात ०६ गोवंश जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून एक वरना कार क्रं एम.एच.०४ डि. एन ६९०७ किंमती २,५०,०००/— रूपये. व ०६ गोवंश जनावरे किंमती ४०,००० /— रूपये असा एकुण किंमती २,९०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे. सुटका केलेल्या गोवंश जनावरांना पालन पोषणाच्या दृष्टीकोणातुन गौ—विज्ञान अनुसंधान केंद्र, देवलापार येथे दाखल करण्यात आले आहे.

हुन्डाई वरना कार क्रं एम.एच.०४ डि. एन ६९०७ चा चालक आणि मालक यांच्या विरूध्द प्राणी छळ प्रतिबंधक अधि. सहकलम महा. पशु संरक्षण अधिनियम सहकलम ११९ म. पो.का ,सहकलम १८४ मो.वा.का .अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## खापरखेडा मर्ग क्रं ३०/२०२५

**पोलीस स्टेशन खापरखेडा :—** येथे मर्ग क्र ३०/२०२५ नोंद असुन यातील मृतक नामे शुभम अशोकरावजी बोबडे, वय २७ वर्ष ,रा पोटा ता. सावनेर यांने त्याच्या राहत्या गळफास घेतल्याने सदर मर्ग नोंद आहे.खापरेखेडा पोलीस सदर मर्ग ची चौकशी करीत असुन पोलसांच्या चौकशीत असे दिसुन येत आहे की, मृतक ची आई ही हातमजुर करीत असुन मृतक हा कोणतेही कामधंदा करीत नव्हता. मृतक त्याच्या आईला मागील २ ते ३ महीन्यापासुन मोटर सायकल घेवुन मागत होता. मृतकाची आई त्याला मोटर सायकल घेवुन देत नव्हती. तसेच मृतक याचा त्याचे मामा सोबत संपत्तीबाबत वाद सुरू होता. या कारणाने मृतकाने मानसिक तणावाखील आत्महत्या केली असल्याची माहीती प्राप्त झाली आहे. सदर प्रकरणाची सखोल चौकशी खापरखेडा पोलीस करीत आहेत.

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद , केळवद पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन केळवद** :— दिनांक ०३/०६/२०२५ रोजी केळवद पोलीस पोस्टे परीसरात पेट्रोलींग करीत असता गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुची वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी बिहाडा फाटा येथे नाकाबंदी केली असता निळया रंगाची, सुझुकी फ्रोन्स चारचाकी वाहन क्र. एम एच ४० सी एक्स ४९८६ या वाहनाला थांबवुन वाहनाची तपासणी केली असता वाहनामध्ये महाराष्ट्र राज्यात बंदी असलेला सुगधीत तंबाखु मिळुन आाला. वाहनात चालकासह अजुन दोन ईसम हजर होते. त्यांना त्यांची नाव पत्ता विचारले असता चालक आरोपी क्रं १) संजु देवीदारस साहू, वय—२८ वर्षे, आरोपी क्रं २) योगेश बिसालीक यादव, वय—२२ वर्षे, ३) संजय अशोक निशाद, वय—२४ वर्षे, सर्व रा. वार्ड क्रं ३, छिंदवाडा रोड, जवाहर नगर,महादुला, कोराडी कॉलनी ता. कामठी जि. नागपुर हे मिळुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष १) सुगंधित च्चुयिंग तंबाखु (बागबांन—४७ बॅन्ड) ५०० ग्रॅम वजनाची एकुण १५ कंपनी पॅकबंद टिन, एकुण ७.५ कि. ग्रॉम किमंती रु. १०,८७५/— रुपये २) सुझुकी फ्रोन्स चारचाकी वाहन क्र. एम. एच. ४० सी. एक्स. ४९८६ किंमती . ८,५०,०००/—रूपये ३) तीन अॅड्रॉईड मोबाईल किंमती .७५,०००/—रूपये असा एकुण ९,३५,८७५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नमुद आरोपीतांनी सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उत्पादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा व वाहतुक केली आहे. नमुद आरोपीतांविरूद्ध पोस्टे केळवद येथेभारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३, ३(५) सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने